राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

<u>निवडणूका तात्काळ</u>
अनिवार्य पत्रव्यवहार

क्र.रानिआ/जिपपंस/२००६/प्र.क्र.२५/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १४/०१/२००७.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,

**विषयः- जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील सार्वत्रिक निवडणूका-२००७.**
**मतदार याद्या पुरविण्याबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, राज्य निवडणूक आयोगाकडे मतदार यादी विनामूल्य किंवा त्याची किंमत किती आकारावी यासंदर्भात ब-याचवेळा विचारणा करण्यात येते. त्याअनुषंगाने आपले लक्ष राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक रानिआ-१०९७/८१६/९७/पंस,दिनांक २४/०१/१९९७ च्या पत्राकडे वेधण्यात येत असून त्या पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. तसेच येथे नमूद करण्यात येते की, मतदार यादी विनामूल्य देण्याची अधिनियमात तरतूद नसल्याने यादीची मागणी करणा-यास यादी छपाईकरीता होणा-या खर्चाचा विचार करुन यादीची किंमत ठरवावी व त्या दराने याद्या पुरविण्यात याव्यात.

वरील तरतुदी सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

आपला,
(सही)
(ध.मा.कानेड)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

O.(243)(6)

6

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक रानिआ १०९७/८१६/९७/परा.,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक २४ जानेवारी १९९७.

प्रति,

जिल्हाधिकारी
अकोला.

**विषय** :—जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या मतदार गट व मतदान गणाच्या प्रारूपाच्या प्रती मागणीबाबत.

**संदर्भ**.—आपले क्र. कक्ष-११/जिपपसनि/कावि/२३३/९७, दिनांक १३ जानेवारी १९९७ चे फॅक्स पत्र.

महोदय,

मतदार गट व मतदार गणाच्या मतदार याद्या विनामूल्य देण्याची कायद्यामध्ये तरतूद केलेली नसल्याने मतदार-याद्यांची मागणी करणारांस मतदार याद्यांच्या कागद छपाई, वगैरे बाबींसाठी आलेल्या खर्चाचा विचार करून आपण यादीची किंमत निश्चित केलेल्या दराने मूल्य घेऊन देण्यात याव्यात.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

**र. गो. चिटणीस,**
कक्ष अधिकारी
राज्य निवडणूक आयोग.

प्रत.—सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)